पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अमरावती
• वर्ष १ • अंक १३० • रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ • मूल्य ३ • पृष्ठे ४
RNI No.- MHAR/ 26 / A2977 Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 Web.http://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

यश मिळवायचे असेल, तर प्रत्येक अपयशाला सामोरे जाण्याची तयारी ठेवा...




# अकोल्याचा पाणीपुरवठा धोक्यात!

## २८ किमीच्या पाईपलाईनला 'फॉरेस्ट' आणि 'रॉक'चा ब्रेक

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**अकोला :** अकोला शहरावर भीषण पाणीटंचाईचे सावट गडद होत चालले आहे. पुढील पावसाळ्यापर्यंत शहराला सुमारे १५ ते २० दशलक्ष घनमीटर पाण्याची अत्यंत गरज आहे. जून महिन्यापर्यंत अकोलेकरांची तहान भागवण्यासाठी प्रशासनाकडून आणीबाणीच्या पातळीवर नियोजन आखले जात आहे. या नियोजनानुसार पातूर येथील मोर्णा प्रकल्पातील पाणी महान येथील काटेपूर्णा प्रकल्पात आणून महान च्या जलशुद्धीकरण केंद्राद्वारे अकोला शहराला पाणी पुरवण्याचे प्रस्तावित आहे.

मात्र, या योजनेच्या अंमलबजावणीत आता निसर्गाची आणि प्रशासकीय मंजुरींची मोठी आडकाठी उभी राहिली आहे. त्यात राज्य शासनाने पाणी टंचाई पाहता जवळ पास ७० कोटींचा निधी या कामासाठी देण्याची गरज आहे. जर निधी वेळेवर मिळाला नाही तर अकोलेकरांच्या घशाला कोरड पडल्याशिवाय राहणार नाही.

मोर्णा धरण ते महान असा तब्बल २८ किलोमीटर लांबीचा पाईपलाईन मार्ग तयार केला जाणार आहे. मात्र, या मार्गातील बराच भाग हा घनदाट जंगल आणि कठीण खडकांनी व्यापलेला आहे. राखीव वनक्षेत्रात नियम आणि पर्यावरणाच्या कारणांमुळे 'रॉक ब्लास्टिंग' (खडक फोडणे) करता येत नसल्याने ही २८ किमीची पाईपलाईन टाकायची कशी, असा गंभीर प्रश्न प्रशासनासमोर निर्माण झाला आहे. याशिवाय वन विभाग, महसूल विभाग आणि संबंधित स्थानिक ग्रामपंचायतींच्या परवानग्या मिळवण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर असेल.

या संपूर्ण टंचाई निवारण योजनेसाठी राज्य शासनाकडून १०० कोटी रुपयांच्या निधीची तात्काळ गरज अकोल्याला आहे. जर जानेवारी महिन्यापर्यंत मोर्णा धरणाचे पाणी काटेपूर्णा प्रकल्पात पोहोचले नाही, तर आगामी उन्हाळ्यात अकोलेकरांचे प्रचंड हाल होणार असून शहरात तीव्र पाणीटंचाईचे संकट निर्माण होईल. अकोलेकरांच्या घशाला कोरड पडल्याशिवाय राहणार नाही अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.सध्या या गंभीर परिस्थितीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अकोला महानगरपालिका आणि जिल्हाधिकारी कार्यालय यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. टंचाईच्या निकषांनुसारच पाणीपुरवठा केला जाणार असल्याने अकोलेकरांनी आतापासूनच पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरणे गरजेचे आहे, अन्यथा पाण्याचे संकट अधिक भीषण रूप धारण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.




### शहरात आता १० दिवसांआड पाणी

अकोला: अकोला शहरावर पुन्हा एकदा तीव्र पाणीटंचाईचे भीषण सावट पसरले आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य 'काटेपूर्णा' प्रकल्पातील उपयुक्त जलसाठा झपाट्याने खालावल्याने महानगरपालिका प्रशासनाने अत्यंत कठोर निर्णय घेतला आहे. शहरात आता आठ ऐवजी १० दिवसांच्या अंतराने, म्हणजेच थेट अकराव्या दिवशी पाणीपुरवठा केला जाणार असून, हे नवे वेळापत्रक ४ ऑक्टोबरपासून लागू करण्यात आले आहे. काटेपूर्णा धरणात १ ऑक्टोबर रोजी केवळ १६.२९ दशलक्ष घनमीटर म्हणजेच अवघा १८.८७ टक्के उपयुक्त जलसाठा शिल्लक राहिला आहे. अपुरा पाऊस आणि वाढत्या उन्हामुळे धरणातील पाण्याची पातळी जलद गतीने खाली जात असल्याने, आगामी उन्हाळ्यापर्यंत पाण्याचे नियोजन टिकवून ठेवण्यासाठी महापालिकेला पाणीपुरवठ्याचे अंतर वाढवणे भाग पडले आहे. धरणातील शिल्लक साठा पाहता अकोलेकरांनी पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरावा आणि पाण्याचा अपव्यय पूर्णपणे टाळावा, असे कळकळीचे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी केले आहे.

## »थोडक्यात

### भीषण अपघातात आई-वडिलांसह चिमुकल्याचा अंत!

नागपूर : नागपूरच्या वर्धा मार्गावरील जामठा परिसरातील गवसी-मानापूर शिवारात भरधाव ट्रेलरने दुचाकीला मागून जोरदार धडक दिल्यानं एकाच कुटुंबातील तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. मृतांमध्ये पती-पत्नी आणि त्यांच्या चार वर्षांच्या चिमुकल्याचा समावेश आहे. या भीषण अपघातात त्यांचा सहा वर्षांचा मुलगा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर एम्स रुग्णालयात उपचार सुरू आहेत. शनिवारी रात्री सुमारे ९ वाजताच्या सुमारास हा अपघात झाला. योगेश सुदाम नाईक (३५), सुनीता योगेश नाईक (३२) आणि गुलशन ऊर्फ गोलू योगेश नाईक (४ ) अशी मृतांची नावे आहेत.

### अजितदादांचा फोटो वापरणारच!

पुणे : निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी अजितदादांचा फोटो आणि नाव वापरण्यावर घातलेल्या बंदीच्या विरोधात सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत पॅनेल प्रमुख पुरुषोत्तम जगताप यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांनी थेट निवडणूक अधिकाऱ्यांना पत्र लिहून या निर्णयाला आव्हान दिले असून, या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची जोरदार मागणी केली आहे.

### जवानाचा मृतदेह घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिकेला अपघात; ४ ठार

लखनऊ : उत्तर प्रदेशातील पूर्वांचल एक्स्प्रेस वेवर एक अत्यंत हृदयद्रावक आणि भीषण अपघाताची घटना घडली. लडाखमध्ये शहीद झालेल्या एका जवानाचे पार्थिव घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिकेने रस्त्याकडेला उभ्या असलेल्या ट्रकला मागून जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भयंकर होती की रुग्णवाहिकेचा अक्षरशः चक्काचूर झाला. या भीषण अपघातात रुग्णवाहिकेत असलेल्या चार जणांचा जागीच मृत्यू झाला.

**CLASSIFIED**

**पाहिजेत**

Myntra कंपनी करिता डिलिव्हरी बॉय पाहिजेत
- साई नगर रूट
- तपवन रूट
- गोपल नगर

आमचा पत्ता
मोती बाग जवळ मोती नगर
अमरावती 444606
संपर्क 8626048727

# ..तर तुमची हुकूमशाही गाडून टाकू - उद्धव ठाकरे

प्रतिनिधी ४ सप्टेंबर



**मुंबई :** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत ठाकरे बंधूंनी तिरंगा मोर्चा काढला आहे. मेट्रो सिनेमा ते महापालिका मुख्यालय असा हा मोर्चा निघाला आहे. या मोर्चामध्ये तिरंगा ध्वज हाती घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष, काँग्रेस, शिवसेना, मनसे, शेकाप हे पक्ष सहभागी झाले आहेत. मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आक्रमक भाषण केलं. हा लढा आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचा लढा आहे. मला आठवतं आहे की पहिल्यांदा मोदी पंतप्रधान झाले तेव्हा त्यांनी मेक इन इंडियाची घोषणा दिली होती. आम्हाला ती घोषणा मान्य आहे. पण हुकूमशाही मेक इन इंडियात असेल तर त्याला गाडून टाकण्यासाठीच आम्ही इथे उभे राहिलो आहोत, असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे. बाकी सगळं मेक इन इंडिया ठीक आहे. पण हुकूमशाहा बनत असाल तर तुमची हुकूमशाही गाडून टाकली असं समजा असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे. संपूर्ण देशातून या सगळ्यांनी मिळून १३ कोटी मतदार वगळून टाकले आहे. म्हणजे महाराष्ट्राची जेवढी लोकसंख्या आहे तेवढे मतदार यांनी वगळले आहेत. हे तुम्हाला मान्य आहे का? असा संतप्त सवालही यावेळी उद्धव ठाकरेंनी त्यांच्या भाषणात केला. मुख्य निवडणूक आयुक्ताची निवडणूक का होत नाही? नेमणूक कशी होते? त्या समितीत पूर्वी सरन्यायाधीश होते त्यांना काढून टाकलं आहे. विरोधी पक्षनेता ठेवला. यांचा मंत्री त्या सरन्यायाधीशांच्या जागी आहे. म्हणजेच निवड समितीत मंत्री कोण तर अमित शाह. कमिटीमध्येच दोन विरूद्ध एक असं झालं आहे. राहुल गांधींनी असहमती दर्शवली होती तरीही ज्ञानेश कुमार यांना नेमून मोकळे झाले. कोर्टाची सुनावणी व्हायची होती पण त्याला तारीखच मिळाली नाही. ज्ञानेश कुमारांची नेमणूकच पक्षपातीपणाने झाली आहे. असाही आरोप उद्धव ठाकरेंनी केला आहे. काँग्रेस एवढं भ्रष्ट सरकार नाही असं वातावरण भाजपाने निर्माण केलं होतं. आता इंडिया अगेन्स्ट व्होटचोर हे वातावरण झालं आहे.

### उद्धव ठाकरे ९ ऑक्टोबरला अकोल्यात!

शिवसेना (उबाठा)चे पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे ९ ऑक्टोबर रोजी अकोला दौऱ्यावर येत आहेत. सध्याची दुष्काळी परिस्थिती, नुकताच मुंबईत निवडणूक आयुक्तांविरोधात काढलेल्या महामोर्चाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या दौऱ्याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

# बिर्ला गेट रेल्वे क्रॉसिंग 5 दिवसांसाठी बंद!

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**अकोला :** अकोला शहरातील बिर्ला गेट (लेव्हल क्रॉसिंग गेट क्र. ३८) ५ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर २०२६ दरम्यान सर्व प्रकारच्या रस्ते वाहतुकीसाठी तात्पुरते बंद ठेवण्यात येणार आहे. या विषयी ची कुठली ही सुचना रेल्वेच्या स्थानिक अधिकाऱ्यांना रेल्वे गेटवर लावली नाही. त्यामुळे न्यू तापडीया नगरवासियांमध्ये संभ्रम आहे. मध्य रेल्वेच्या वरिष्ठ विभाग अभियंता (मार्ग) कार्यालयाकडून दिलेल्या माहितीनुसार, अकोला यार्डातील रेल्वे ट्रॅकच्या तातडीच्या दुरुस्ती व देखभाल कामासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. या कालावधीत बिर्ला गेटवरून होणारी वाहतूक पूर्णपणे रोखली जाणार असल्याने, वाहनधारकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा आणि रेल्वे प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. यासंदर्भातील अधिकृत पत्र जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त आणि पोलीस प्रशासनाला देण्यात आले आहे. दरम्यान,न्यू तापडीया नगरवासियांना अकोट फाईल मार्गे जाणे येणे करावे लागणार असून त्यांचा मासिक खर्च यामुळे वाढणार आहे. उड्डाणपुलाचे काम कधी होते अशी विचारणा सातत्याने या भागातील नागरिक करत आहे.

### बंद राहण्याचा कालावधी :

सोमवार, दिनांक ०५/१०/२०२६ रोजी सकाळी ०६:०० वाजेपासून ते शुक्रवार, दिनांक ०९/१०/२०२६ रोजी रात्री २०:०० वाजेपर्यंत (दिवस-रात्र) हे रेल्वे गेट बंद राहणार आहे.

### ज्ञानेश कुमार यांच्या जुन्या प्रकरणाची चौकशी होणार!

**तिरूअनंतपूरम :** भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याशी संबंधित तब्बल दोन दशके जुन्या एका संवेदनशील प्रकरणात केरळ सरकारने अत्यंत मोठे पाऊल उचलले आहे. केरळचे गृहमंत्री रमेश चेन्निथला यांनी २००६ मधील एका मलेशियन सिव्हिल इंजिनिअरच्या कथित आत्महत्या प्रकरणात थेट लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (व्हिजिलन्स) सखोल चौकशीचे अधिकृत आदेश जारी केले आहेत.

या जुन्या प्रकरणात तपास यंत्रणेवर बाहेरून राजकीय अथवा प्रशासकीय दबाव टाकून मूळ तपास दडपल्याचे गंभीर आरोप समोर आल्यानंतर सरकारने ही फेरचौकशी सुरू केली आहे.हे संपूर्ण प्रकरण २००६ मधील आहे, जेव्हा ज्ञानेश कुमार हे केरळ सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव म्हणून कार्यरत होते.'

## चतुर्थ पुण्यस्मरण

निमित्त

**विनम्र अभिवादन !**



**बुद्धवासी गुंफाबाई ग्यानेश्वर वाघमारे**

शोकाकुल

**डॉ. सुगत वाघमारे**

आणि परिवार

* तिक्षणगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी
* अजिंक्य भारत वृत्तपत्र समुह *सम्यक संबोधि संस्था
* अदु-तिशु प्रोडक्शन्स * डिक्की समुह *तेलंग परिवार
*खंडारे परिवार * श्रृंगारे परिवार * वानखडे परिवार
*पळसपगार परिवार *भशारकर परिवार*चौरपगार परिवार

# गिधाड संवर्धनात महाराष्ट्राची भरारी!

## मेळघाट, पेंच यशस्वी मुक्तता केंद्रे

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**मुंबई :** नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या गिधाडांच्या संवर्धनात महाराष्ट्राने महत्त्वाची कामगिरी केली आहे. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी आणि महाराष्ट्र वन विभागाच्या संयुक्त प्रयत्नांमुळे मेळघाट आणि पेंच व्याघ्र प्रकल्प हे गिधाडांना निसर्गात सोडण्याच्या देशातील यशस्वी केंद्रांपैकी ठरले आहेत. या गिधाडांच्या हालचाली सॅटेलाइटद्वारे टिपल्या जात असून, मेळघाटमधील दोन मादी गिधाडांनी हजारो किलोमीटरचा प्रवास केला आहे.डिसेंबर २०२५ मध्ये पेंचमध्ये १४ गिधाडे निसर्गात सोडण्यात आली. त्यापैकी ७८ टक्के गिधाडे नऊ महिन्यांनंतरही सुरक्षित आहेत. जानेवारी २०२६ मध्ये मेळघाटमध्ये सोडलेल्या १५ गिधाडांपैकी ६० टक्के गिधाडे सध्या निसर्गात वावरत आहेत. गिधाडांसाठी घातक ठरणाऱ्या 'डायक्लोफेनॅक' औषधाचा वापर रोखण्यासाठी मेडिकल स्टोअर्सवर लक्ष ठेवले जात आहे. तसेच गोशाळा चालक, नागरिक आणि पर्यटकांमध्ये जनजागृती केली जात आहे. जखमी किंवा थकलेली गिधाडे आढळल्यास उपचारासाठी पथकेही कार्यरत आहेत.



### २५ वर्षांत ८०० गिधाडांचा जन्म

बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (बीएनएचएस) आणि वन विभागाच्या प्रयत्नांतून गिधाडांची पैदास करून त्यांना पुन्हा जंगलात सोडले जात आहे. भारतातील गिधाड संवर्धन आणि पैदास कार्यक्रमाला २५ वर्षे पूर्ण झाली असून, या काळात ८०० हून अधिक गिधाडांचा जन्म झाला आहे.

### गिधाडांचा महाराष्ट्रात मुक्त संचार

महाराष्ट्रातील जंगलात सोडण्यात आलेल्या गिधाडांचा जन्म हरियाणातील पिंजोर येथील 'जटायू संरक्षण आणि पैदास केंद्रात' झाला आहे. या केंद्रालाही २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. हरियाणाचे मुख्य वन्यजीव रक्षक नवदीप सिंग यांनी पिंजोर केंद्र हे आशियातील गिधाड संवर्धनासाठी आदर्श केंद्र ठरत असल्याचे सांगितले.

सिटी न्यूज सुपरफास्ट संमिश्र
रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


# पातूर-बाळापूर महामार्गावर ऑटो पलटी
## जखमी प्रवाशाचा उपचाराअभावी मृत्यूचा आरोप

प्रतिनिधी ४ ऑक्टोबर



**पातूर :** पातूर-बाळापूर महामार्गावरील बाळापूर नाका येथे ऑटो पलटी होऊन झालेल्या भीषण अपघातात एका प्रवाशाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर दोन जण किरकोळ जखमी झाले आहेत. या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, अपघातानंतर वेळेवर वैद्यकीय उपचार मिळाले असते तर जीव वाचला असता का? असा गंभीर सवाल नातेवाईक व नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एमएच ३० जी ९७८ क्रमांकाचा ऑटो बाळापूर नाका परिसरात अचानक पलटी झाला. या ऑटोमध्ये प्रवास करणारे प्रशांत एरोडीस चव्हाण, रा. जांभरुण हे गंभीर जखमी झाले. त्यांच्यासह अन्य दोन प्रवासी जखमी झाले.

अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी उपस्थित युवकांनी तातडीने १०८ रुग्णवाहिकेला फोन केला. मात्र, रुग्णवाहिकेत डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे उपचार मिळण्यास विलंब झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यानंतर जखमी प्रशांत चव्हाण यांना प्राथमिक आरोग्य केंद्रात आणण्यात आले. मात्र, येथेही वैद्यकीय अधिकारी उपस्थित नसल्याचा आरोप नातेवाईकांकडून करण्यात आला. उपचारासाठी झालेल्या विलंबानंतर प्रशांत चव्हाण यांचा मृत्यू झाला.

या प्रकारामुळे नातेवाईक आणि नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. रस्त्यावर अपघात होणे ही एक बाब; मात्र अपघातग्रस्ताला वेळेवर उपचार न मिळणे ही त्याहून गंभीर बाब आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

याप्रकरणी युवा सेना जिल्हाप्रमुख सागर रामेकर यांनी १०८ रुग्णवाहिकेवरील संबंधित कर्मचाऱ्याची चौकशी करून दोषी आढळल्यास कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच अपघातास जबाबदार असलेल्या व्यक्तींवरही कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवू देणार नाही, अशी भूमिका नातेवाईकांनी घेतल्याचे समोर आले आहे. त्यामुळे घटनास्थळी तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या घटनेची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन १०८ सेवेतील विलंब, प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची उपस्थिती आणि उपचार मिळण्यास झालेला विलंब याची स्वतंत्र चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

अपघातातील मृत्यू नेमका अपघातामुळे झाला की वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे परिस्थिती गंभीर झाली, याची निष्पक्ष चौकशी होणे आता अत्यावश्यक आहे.

## लाखनवाडा जवळ अपघातात तिघे जखमी



**अकोला :** लाखनवाडा जवळ काल रात्री सुमारे ९:३० वाजेच्या सुमारास एक दुचाकी अचानक रस्त्यात प्राणी आल्याने अनियंत्रित होऊन दुभाजकाला धडकली. या अपघातात तीन जण गंभीर जखमी झाले.

त्यापैकी बार्शीटाकळी तालुक्यातील जलालाबाद येथील रहिवासी अर्पिता यांची प्रकृती चिंताजनक आहे. सर्व जखमींवर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या अपघातात बजरंग आणि पूनम हे सुद्धा गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी जिल्हा सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अपघात झाल्यावर मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. रात्री अपघात झाला तसेच अपघात स्थळ दूर असल्याने मदत मिळण्यात अडचण आली होती. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यासाठी काही जणांनी पुढाकार घेतला. यातील महिलेची प्रकृती गंभीर आहे अशी माहिती मिळाली.

# 12 एकर सोयाबीन आगीत भस्मसात; आग लागली की लावली?
## दिग्रसच्या महिला शेतकऱ्याचे मोठे नुकसान

प्रतिनिधी ४ ऑक्टोबर

**पातूर :** दुष्काळसदृश परिस्थितीत पिकाला जीवापाड जपणाऱ्या दिग्रस येथील महिला शेतकरी अनुसया सुभाष महल्ले यांच्या १२ एकर सोयाबीन पिकाला आग लागून संपूर्ण पीक जळून खाक झाले. मात्र, ही आग नेमकी कशामुळे लागली, याबाबत प्रश्न निर्माण झाला असून ही घटना अपघात होती की कोणीतरी जाणीवपूर्वक आग लावली? याचा तपास करण्याची मागणी होत आहे.

महल्ले यांनी दहा हजार रुपये ठोक्याने शेती करून सोयाबीनची पेरणी केली होती. पावसातील खंड आणि प्रतिकूल परिस्थितीत पीक उभे करण्यासाठी त्यांनी मोठा खर्च



केला. या पिकावर पाच जणांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची आशा होती. मात्र, आगीच्या घटनेत संपूर्ण पीक जळाल्याने कुटुंबासमोर मोठे आर्थिक संकट उभे ठाकले आहे.

आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसताना घटनेची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. आग स्वतःहून लागली की मानवी हस्तक्षेपामुळे घटना घडली, याचा तपास करून सत्य समोर आणण्याची मागणी महिला शेतकऱ्याने केली आहे.

दरम्यान, प्रशासनाने घटनास्थळी पाहणी करून नुकसानीचा पंचनामा करावा, आगीचे कारण स्पष्ट करावे आणि जर जाणीवपूर्वक आग लावल्याचे निष्पन्न झाले तर संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दुष्काळाच्या संकटात उभे केलेले १२ एकर पीक आगीत जळाल्याने “आगीने पीक जाळले की कोणीतरी शेतकऱ्याची आशाच जाळली?” असा सवाल उपस्थित झाला आहे.

# आता कॅब सारखीच बुक होणार ॲम्बुलन्स
## कॅब बुकिंग प्रमाणेच ॲम्बुलन्स साठी आता ॲप किंवा वेबसाईट

प्रतिनिधी ४ ऑक्टोबर

**अकोला :** रुग्णवाहिका सेवा अधिक जलद आणि पारदर्शक करण्यासाठी महाराष्ट्र सरकार कॅब बुकिंगप्रमाणेच एक डिजिटल प्लॅटफॉर्म सुरू करण्याची योजना आखत आहे. प्रस्तावित ॲप किंवा वेबसाइटद्वारे, नागरिक जवळपास उपलब्ध असलेल्या रुग्णवाहिका शोधू आणि बुक करू शकतील. हा प्लॅटफॉर्म रुग्णवाहिकेचे थेट ठिकाण, पोहोचण्याची अंदाजित वेळ आणि भाड्याची माहिती देण्याची योजना आखत आहे. प्रवासादरम्यान रुग्णवाहिकांना डॉक्टर आणि नर्स यांच्यासह मूलभूत वैद्यकीय सहाय्य

### गोल्डन अवर'वर लक्ष

रस्ते अपघातानंतरच्या पहिल्या तासाला लक्षात घेऊन ही प्रणाली विकसित करण्याची योजना आहे. उपलब्ध रुग्णवाहिकांविषयी तत्काळ माहिती उपलब्ध करून दिल्यामुळे, रुग्णांना आणि त्यांच्या कुटुंबियांना आपत्कालीन परिस्थितीत अनेक ठिकाणी फोन करण्याऐवजी एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवरून सेवा मिळवता येतील.




देण्याच्या पर्यायाचाही विचार केला जात आहे. ही योजना सध्या प्राथमिक टप्प्यात आहे. परिवहन विभागाने प्रस्तावित केलेली ही प्रणाली, विविध प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये नोंदणीकृत रुग्णवाहिकांच्या डेटाचा वापर करेल. आरोग्य विभाग, रुग्णालये आणि खासगी रुग्णवाहिका चालकांच्या सहकार्याने ही प्रणाली विकसित करण्याची योजना आहे. खाजगी चालकांसाठी या प्लॅटफॉर्मवर रुग्णवाहिकांची नोंदणी अनिवार्य केली जाण्याची शक्यता आहे.

# प्राणी हे निसर्गातील अन्नसाखळीतील एक महत्वाचा घटक!



## आज जागतिक प्राणी दिन

जागतिक प्राणी दिन दरवर्षी ४ ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो. या दिवशी प्राण्यांचे कल्याण, संरक्षण आणि त्यांच्याशी माणुसकीने वागण्याबद्दल जागरूकता निर्माण केली जाते. तसेच, परिसंस्थेतील प्राण्यांची भूमिका आणि वन्यजीवांच्या संरक्षणाची गरज यावरही हा दिवस प्रकाश टाकतो. हा दिवस पाळीव, शेतीतील आणि वन्य प्राण्यांच्या कल्याणावर लक्ष केंद्रित करतो. लोक आणि संस्था या दिवसाचा उपयोग जनजागृती करण्यासाठी आणि प्राण्यांना चांगली वागणूक मिळावी यासाठी पाठिंबा देण्यासाठी करतात.

पहिला जागतिक प्राणी दिन कार्यक्रम १९२५ मध्ये जर्मनीतील बर्लिन येथे पार पडला . हेनरिक झिमरमन यांनी स्पोर्ट्स पॅलेसमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. मिळालेल्या माहितीनुसार, या कार्यक्रमाला ५,००० हून अधिक लोक उपस्थित होते. नंतर, आयोजकांनी हा कार्यक्रम ४ ऑक्टोबर रोजी आयोजित केला. त्यांनी ही तारीख निवडली कारण त्या दिवशी असिसीचे संत प्रâान्सिस यांचा सण असतो. संत प्रâान्सिस ऑफ असिसी हे प्राणी आणि निसर्गाप्रती असलेल्या करुणेसाठी ओळखले जातात. कॅथोलिक परंपरेनुसार, ते प्राणी आणि पर्यावरणाचे संरक्षक संत आहेत . जागतिक प्राणी दिनानिमित्त त्यांच्या सणाच्या दिवशी प्राण्यांबद्दल काळजी आणि आदराची भावना वाढवली जाते. हा दिवस लोकांना आठवण करून देतो की प्राण्यांना योग्य काळजी आणि सुरक्षित राहणीमानाची गरज असते. तसेच तो क्रूरता, शोषण आणि अधिवासाचा ऱ्हास याकडेही लक्ष वेधतो. वन्यजीव संरक्षण हे निरोगी परिसंस्था आणि जैवविविधतेशी जवळून निगडित आहे. प्राणी कल्याण म्हणजे प्राण्यांच्या आरोग्याची, सुरक्षिततेची आणि कल्याणाची काळजी घेणे . यामध्ये पाळीव प्राणी, शेतातील प्राणी आणि वन्यजीव यांचा समावेश होतो. चांगल्या कल्याणकारी पद्धतींचा उद्देश प्राण्यांचे दुःख कमी करणे आणि त्यांना राहण्यासाठी योग्य परिस्थिती प्रदान करणे हा असतो. वन्य प्राण्यांसाठी, त्यांचे कल्याण त्यांच्या अधिवासाच्या संरक्षणाशी देखील जोडलेले आहे. निरोगी जंगले, पाणथळ जागा आणि गवताळ प्रदेश प्राण्यांना जगण्यास आणि संतुलित परिसंस्था टिकवून ठेवण्यास मदत करतात.

प्राण्यांचे कल्याण हे भारताच्या शेती, जंगले आणि अन्नप्रणालीसाठी देखील महत्त्वाचे आहे. प्राण्यांची उत्तम काळजी घेतल्यास शाश्वत शेती आणि जबाबदार कृषी-अन्न उत्पादनास चालना मिळू शकते. नवीन कृषी तंत्रज्ञान आणि भारतीय स्टार्टअप्स देखील शेतकऱ्यांना प्राण्यांची काळजी आणि संसाधनांचा वापर सुधारण्यास मदत करू शकतात.

पाळीव प्राणी तसेच इतरही प्राण्यांवर आपल्या मुलांप्रमाणे प्रेम करणाऱ्यांची संख्या काही कमी नाही.आजचा दिवस अशा लोकांसाठी खास आणि महत्वाचा आहे. जगभरात दरवर्षी ४ ऑक्टोबर हा दिवस जागतिक प्राणी दिन म्हणून साजरा केला जातोय. असिसिचे संत प्रâान्सिस यांचं प्राण्यावर खूप प्रेम होतं. त्यांनी ४ ऑक्टोबर १९२५ या दिवशी प्राण्यासाठी 'उत्सव दिन' साजरा करायला सुरुवात केली. त्यानंतर १९३१ साली इटली येथे इंटरनॅशनल ॲनिमल प्रोटेक्शन काँग्रेस भरवण्यात आली होती. त्यामध्ये संत प्रâान्सिस यांचा सन्मान म्हणून ४ ऑक्टोबरला आंतरराष्ट्रीय प्राणी दिवस साजरा करण्याचं ठरवलं.

जागतिक प्राणी दिनाचा मूळ उद्देश हा जगभरातील प्राण्यांच्या परिस्थितीवर आवाज उठवणे आणि त्यांच्या कल्याणासाठी उपाययोजना करणे, त्याबद्दल जागरुकता निर्माण करणे हा आहे. आजच्या दिवशी जगभरातील प्राणीमित्र संघटना, प्राणी हक्क संघटना तसेच या विषयावर कार्य करणाऱ्या विविध संघटना एकत्रित येतात आणि जनजागृती निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. जगभरातले सर्व प्राणी, म्हणजे पाळीव प्राणी आणि जंगलातले प्राणी, या सर्वांवर प्रेम करणाऱ्या, त्यांच्या संवर्धनासाठी प्रयत्न करणाऱ्या लोकांचाही आज सन्मान केला जातो. पशु-पक्षी, प्राणी यांच्या संरक्षणाचे जे काही कायदे आहेत, त्यांना अद्ययावत बनवण्यासाठी विविध प्राणी संघटना प्रयत्न करतात. त्यामुळे शिकारी अथवा तस्कर हे कायद्यातील पळवाट शोधून पळून जाणार नाहीत.

प्राणी हे निसर्गातील अन्नसाखळीतील एक महत्वाचा घटक आहेत. आजही जगभरातल्या जवळपास एक अब्ज गरीब लोकांना प्राण्यांमुळे रोजगार मिळतोय. त्यामुळे शाश्वत विकासासाठी प्राण्याची काळजी घेणे, त्यांचं संवर्धन करणे अत्यावश्यक आहे.

# क्रीडापटूंकडून मार्केटिंगचे प्रेरणादायी धडे


**नितीन बक्षी**
अकोला

### ४. Product Positioning — उत्पादनाचे योग्य स्थान निश्चित करणे

उत्पादनाची Positioning ही मार्केटिंगमधील सर्वांत कठीण गोष्टींपैकी एक आहे. उत्पादन उत्तम प्रकारे विकसित करून त्याची योग्य किंमत ठरवली तरी ग्राहकाच्या मनात ते योग्य प्रकारे स्थान मिळवेलच असे नाही. म्हणून उत्पादन बाजारात आणण्यापूर्वी त्याची बाजारपेठेतील नेमकी ओळख आणि स्थान निश्चित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. स्पर्धकांनी आधीच बाजारात आणलेल्या उत्पादनांचा अभ्यास करून, त्यांच्यापेक्षा आपले उत्पादन कसे वेगळे आहे हे स्पष्ट करावे लागते.

त्याचप्रमाणे क्रीडाक्षेत्रातही एखाद्या खेळाडूला त्याच्या क्षमतेनुसार योग्य स्थान दिले पाहिजे. उदाहरणार्थ, एखादा फलंदाज फिरकी गोलंदाजीविरुद्ध अत्यंत चांगला खेळत असेल, परंतु वेगवान गोलंदाजांविरुद्ध त्याची कमजोरी असेल, तर त्याला वेगवान आणि उसळी घेणाऱ्या खेळपट्टीवर थेट पदार्पण करण्याची संधी देणे योग्य ठरणार नाही. म्हणूनच योग्य व्यक्तीला योग्य भूमिका आणि योग्य परिस्थिती देणे हे Product Positioning प्रमाणेच महत्त्वाचे आहे.

### जाहिरातीची भूमिका

उत्पादनाच्या Positioning मध्ये जाहिरातीचीही महत्त्वाची भूमिका असते. जाहिरातीच्या माध्यमातून ग्राहकांच्या मनात उत्पादनाची योग्य प्रतिमा निर्माण केली जाऊ शकते. उत्पादन कधी बाजारात आणायचे, त्याची जाहिरात कशी करायची, कोणत्या माध्यमातून ग्राहकांपर्यंत पोहोचायचे आणि उत्पादनाची ओळख कशी निर्माण करायची—या सर्व बाबींचा विचार आवश्यक आहे.

५. Product Launching — उत्पादनाचे बाजारात लॉन्चिंग

उत्पादन बाजारात आणणे हा मार्केटिंगमधील आणखी एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. बाजारपेठेचे विश्लेषण, उत्पादनाची रचना, किंमत आणि Positioning योग्य असली तरी उत्पादनाचे Launching योग्य पद्धतीने झाले नाही, तर संपूर्ण प्रयत्नांवर परिणाम होऊ शकतो. क्रीडाक्षेत्रातही नवीन खेळाडूला थेट मोठ्या सामन्यात उतरवण्यापूर्वी त्याला सराव सामने खेळण्याची संधी दिली जाते.

नवीन खेळाडूंना योग्य तयारी करून घेतल्यानंतरच मोठ्या दबावाच्या सामन्यात उतरवले जाते. खेळाडूने परिस्थितीशी जुळवून घेतले आहे का, त्याच्यावरचा दबाव तो सहन करू शकतो का, त्याची मानसिक आणि शारीरिक तयारी झाली आहे का—या सर्व गोष्टी तपासल्या जातात.

**त्याचप्रमाणे उत्पादनाचे Launching करण्यापूर्वी त्याची मार्केट टेस्टिंग करणे महत्त्वाचे आहे.**

उत्पादन बाजारात आणल्यानंतर प्रत्येक टप्प्यावर त्याची कामगिरी तपासली पाहिजे. उत्पादन ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करत आहे का, त्यात काही त्रुटी आहेत का, प्रतिस्पर्धी उत्पादनांशी त्याची तुलना कशी आहे—या सर्व बाबींचे निरीक्षण आवश्यक आहे. उत्पादनाचे Launching हा एक नियोजित आणि सातत्यपूर्ण प्रयत्न असला पाहिजे.

### ६. Actual Sale of Product — प्रत्यक्ष विक्री

उत्पादनाची प्रत्यक्ष विक्री हा मार्केटिंगमधील सर्वांत महत्त्वाचा टप्पा आहे. उत्पादन बाजारात आणणे ही एक गोष्ट आहे; पण ते ग्राहकाला विकणे ही पूर्णपणे वेगळी गोष्ट आहे. चांगला क्रीडापटू कधीही सहज हार मानत नाही. त्याच्यामध्ये शेवटपर्यंत प्रयत्न करण्याची वृत्ती असते. क्रीडा क्षेत्रातील महान खेळाडूंच्या कारकिर्दीकडे पाहिले तर त्यांनी अनेक अडचणींचा सामना करूनही आपले ध्येय सोडले नाही. त्याचप्रमाणे मार्केटिंगमध्येही एखाद्या उत्पादनाची विक्री अपेक्षेप्रमाणे होत नसेल, तर लगेच निराश न होता परिस्थितीचे विश्लेषण करावे. ग्राहकांच्या प्रतिक्रिया समजून घ्याव्यात, विक्रीचे आकडे तपासावेत आणि आवश्यक ते बदल करावेत.

“ग्राहकाला उत्पादन विकणे” एवढेच मार्केटिंगचे काम नाही; ग्राहकाला उत्पादनाची गरज का आहे हे समजावून देणे आणि त्याचा विश्वास मिळवणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

### ७. Services after Sale — विक्रीनंतरची सेवा

मार्केटिंगची प्रक्रिया उत्पादन विकल्यानंतर संपत नाही. विक्रीनंतरची सेवा (After-Sales Service) हा मार्केटिंगचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. ग्राहकाने उत्पादन खरेदी केल्यानंतर त्याला आवश्यक सेवा मिळाली पाहिजे. ग्राहकांच्या समस्या ऐकून घेणे, त्यांचे निराकरण करणे आणि त्यांचा विश्वास कायम ठेवणे आवश्यक आहे. आजच्या स्पर्धात्मक बाजारपेठेत ग्राहकांकडे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे एखाद्या कंपनीने विक्रीनंतरची सेवा चांगली दिली, तर ग्राहक पुन्हा त्याच कंपनीकडे येण्याची शक्यता वाढते.

**क्रीडापटूंकडून येथेही एक महत्त्वाचा धडा घेता येतो.**

खेळाडू निवृत्त झाल्यानंतरही तो प्रशिक्षक, मार्गदर्शक किंवा समालोचक म्हणून आपल्या अनुभवाचा उपयोग पुढील पिढीला करून देऊ शकतो. काही महान खेळाडू निवृत्तीनंतरही क्रिकेट, टेनिस किंवा इतर खेळांमध्ये प्रशिक्षण आणि मार्गदर्शनाचे काम करतात. म्हणजेच मुख्य काम संपल्यानंतरही ग्राहक/समाजाशी संबंध कायम ठेवणे आणि आपला अनुभव पुढे देणे हे महत्त्वाचे आहे.

### लेखाचा मुख्य संदेश. ..

या संपूर्ण लेखातून असा संदेश मिळतो की खेळ आणि मार्केटिंग यांच्यात अनेक साम्यस्थळे आहेत. क्रीडापटूंच्या जीवनातील—प्रतिकूल परिस्थितीत हार न मानणे, कठोर परिश्रम, शिस्त, सातत्य, जिंकण्याची जिद्द परिस्थितीनुसार स्वतःमध्ये बदल करण्याची क्षमता योग्य नियोजन, प्रतिस्पर्ध्यांचा अभ्यास, ग्राहक/प्रेक्षकांच्या अपेक्षा समजून घेणे, ध्येयावर लक्ष केंद्रित ठेवणे आणि शेवटपर्यंत प्रयत्न करत राहणे हे सर्व गुण मार्केटिंग क्षेत्रातही तितकेच उपयुक्त आहेत. म्हणूनच महान क्रीडापटूंच्या कामगिरीचा अभ्यास हा केवळ खेळ समजून घेण्यासाठी नसून व्यवसाय, मार्केटिंग आणि जीवनातील यशाची तत्त्वे समजून घेण्यासाठीही उपयुक्त ठरू शकतो.

उत्तरार्ध...





सिटी न्यूज अकोला
३
रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# मोकाट कुत्र्यांचा अकोटमध्ये हैदोस; एकाच दिवशी 27 जणांना चावा

वि. प्रतिनिधी ४ ऑक्टोबर



**अकोट :** शहरात मोकाट कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस गंभीर होत असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ३ सप्टेंबर रोजी अकोला रोडवरील पोलीस स्टेशन परिसरात एका भटक्या कुत्र्याने तब्बल २७ जणांना चावा घेतल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात काही नागरिक गंभीर जखमी झाल्याने शहरभर भीतीचे वातावरण पसरले आहे.

अकोट शहरातील प्रमुख रस्ते, चौक, बाजारपेठा तसेच रहिवासी वस्त्यांमध्ये मोकाट कुत्र्यांचे टोळके सर्रास फिरताना दिसत आहेत. त्यामुळे नागरिकांना घराबाहेर पडतानाही जीव मुठीत धरावा लागत आहे. विशेषतः दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांसाठी ही समस्या अधिक धोकादायक ठरत आहे. भरधाव वाहनांसमोर अचानक कुत्रे आल्याने अपघातांच्या घटनाही वाढत असल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे.

सरस्वती नगर परिसरातही भटक्या कुत्र्यांचा मोठा त्रास असून शाळकरी मुलांना अनेक वेळा किरकोळ चावे घेतल्याच्या घटना घडल्या आहेत. रात्रीच्या वेळी दवाखान्यातून किंवा बाहेरगावाहून परतणाऱ्या नागरिकांनाही कुत्र्यांच्या हल्ल्यांना सामोरे जावे लागत असल्याचे स्थानिकांनी सांगितले. शहरातील विविध

## प्रशासन झोपेत?

भागांमध्ये अशा घटना सातत्याने घडत असतानाही प्रशासनाकडून प्रभावी उपाययोजना होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

एकाच दिवशी २७ जणांना चावा घेण्याची घटना घडूनही नगरपरिषद आणि संबंधित प्रशासन अद्याप ठोस कारवाई करत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. "प्रशासनाला जाग केव्हा येणार?" असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

शहरातील वाढता धोका लक्षात घेता भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण, लसीकरण, पकड मोहीम तसेच नागरिकांच्या सुरक्षेसाठी तातडीच्या उपाययोजना राबवाव्यात, अशी जोरदार मागणी अकोटकरांकडून करण्यात येत आहे.

### कुत्र्यांच्या हैदोसाला नागरिक कंटाळले

अकोट शहरात काही दिवसांपासून कुत्र्यांचा हैदोस दिसत आहे. एकाच दिवशी लोकांना मोठ्या संख्येने कुत्रे चावल्याने लोकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करावा अशी मागणी केली जात आहे. नगर परिषद प्रशासनाने या महत्त्वाच्या मुद्याकडे दुर्लक्ष करू नये अशी मागणी केली जात आहे.

# मुर्तिजापुरात जनावरांच्या चोरीचा वाढता संशय

प्रतिनिधी ४ ऑक्टोबर

**मुर्तीजापूर :** तालुका प्रतिनिधी

मुर्तीजापूर शहर व परिसरातून गाय, वासरे तसेच शेळ्यांची दिवसाढवळ्या चोरी होत असल्याच्या तक्रारी वाढत असून, चोरी केलेली जनावरे कत्तलीसाठी शहराबाहेर नेली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. या प्रकारामुळे पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, जनावरांच्या चोरीला आळा घालण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी होत आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, काही संशयित व्यक्ती दिवसभर शहरातील विविध भागांत फिरून कोणत्या ठिकाणी जनावरे बांधलेली आहेत, त्यांची पाहणी करतात. त्यानंतर दुपारच्या अथवा रात्रीच्या वेळी वाहनांच्या माध्यमातून जनावरे चोरी करून नेली जात असल्याचा आरोप आहे. विशेषतः जुनी वस्ती व शहरातील इतर भागांत अशा घटना घडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

जुनी वस्ती परिसरातील दानिश कुरेशी व राजा घरकुल या व्यक्तींविरुद्ध यापूर्वी चोरीचे गुन्हे दाखल असल्याचा दावा करण्यात येत असून, त्यांच्या संपर्कातील काही व्यक्तींचे जाळे सक्रिय असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. मात्र, या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नसून पोलिसांच्या तपासानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

चोरीस गेलेली जनावरे माना, बोरगाव, अकोला, अकोट, फाईल आदी परिसरात नेली जात असल्याची माहिती नागरिकांकडून दिली जात आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकारामागे संघटित नेटवर्क आहे का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.

## कत्तलीसाठी वाहतूक होत असल्याचा आरोप

### जामिनावर सुटका होत असल्याची नागरिकांची तक्रार

जनावर चोरीच्या प्रकरणात आरोपींवर कारवाई झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्यांची जामिनावर सुटका होत असल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे वारंवार अशा प्रकारच्या घटनांमध्ये सहभागी असलेल्या संशयितांविरुद्ध कायद्यानुसार कठोर प्रतिबंधात्मक कारवाई करावी, अशी मागणी आहे. मुर्तीजापूर शहरात वाढत असल्याचा दावा केला जाणारा जनावर चोरीचा प्रकार रोखण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाची स्थापना करून तपास करणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. वारंवार चोरी करणाऱ्या टोळ्यांची माहिती संकलित करून त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवावे, तसेच जनावरांची बेकायदेशीर वाहतूक होत असल्यास संबंधितांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

### गुन्हे शाखेने तपासाची दिशा ठरवावी

जनावरांची चोरी ही केवळ स्थानिक पातळीवरील घटना नसून, चोरीच्या जनावरांची वाहतूक, त्यांची खरेदी-विक्री आणि कत्तलीसाठी होणारी संभाव्य वाहतूक याचा तपास करण्याची आवश्यकता आहे. यासाठी मुर्तीजापूर पोलिसांसोबतच अकोला जिल्हा गुन्हे शाखेनेही स्वतंत्रपणे तपास करून या प्रकरणामागील संपूर्ण साखळी शोधून काढावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी



**हिवरखेड :** राष्ट्रपिता महात्मा गांधी, माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती आज येथे उत्साहाने साजरी करण्यात आली. या निमित्ताने सकाळी जिल्हा परिषद महात्मा गांधी विद्यालय येथील गांधी स्मारकाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

तसेच लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या कार्याला उजाळा देण्यात आला. जयंतीनिमित्त समाजसेवकांनी गावात स्वच्छता अभियान राबविले. हिवरखेड बस स्थानक परिसरात तसेच सदाशिव संस्था, नमो उद्यान येथील गांधी स्मारक परिसरात स्वच्छता करून गांधीजींच्या स्वच्छतेच्या संदेशाचा जागर करण्यात आला.

## पातूर पोलिसांची धडक कारवाई; गोवंश मांस जप्त

प्रतिनिधी ४ ऑक्टोबर

**पातूर :** पातूर पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंगदरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पातूर पोलिसांनी धडक कारवाई करून गोवंश मांस विक्री करणाऱ्या एका इसमास ताब्यात घेतले.

०४/१०/२०२६ रोजी पहाटे पेट्रोलिंग करत असताना पातूर शहरातील नगर परिषद शाळा क्र. २ जवळील मोकळ्या जागेत एक इसम गोवंश मांस विक्री करीत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना प्राप्त झाली. सदर माहितीच्या आधारे पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचांसमक्ष कारवाई केली. या कारवाईमध्ये शेख अनसार शेख दुला, वय ४५ वर्षे, रा. मुजावरपुरा, पातूर, जि. अकोला यास ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून अंदाजे ५० किलो गोवंश मांस, तसेच मांस कापण्यासाठी वापरण्यात येणारी लोखंडी सुरी, तराजू, वजनमाप, कुऱ्हाड व लाकडी अंडका असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जप्त केलेल्या गोवंश मांसाचे नमुने पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घेऊन सीलबंद करण्यात



आले असून उर्वरित मांसाची नियमानुसार विल्हेवाट लावण्याची कार्यवाही करण्यात आली. याप्रकरणी महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमातील कलम 5,5ब, 5क, 9,9अ सहकलम 325 भा न्या संहिता कलमांन्वये पातूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास सुरू आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई केली.

## मोक्षदा रसाळेला जिल्हास्तरीय शालेय शूटिंग स्पर्धेत रौप्यपदक



**अकोला :** जिल्हा क्रीडा संकुलात २६ व २७ सप्टेंबर रोजी झालेल्या जिल्हास्तरीय शालेय रायफल अँड पिस्टल शूटिंग स्पर्धेत १४ वर्षे वयोगटात मोक्षदा रसाळे हिने रौप्यपदकाची कमाई केली.

मोक्षदा रसाळे हिने उत्कृष्ट कामगिरी करत रौप्यपदक पटकावले. जिल्हास्तरीय शालेय शूटिंग स्पर्धेत विविध वयोगटातील खेळाडूंनी सहभाग घेतला. खेळाडूंनी दमदार कामगिरी करत पदकांची कमाई केली. मोक्षदाच्या या यशाबद्दल तिचे पालक, प्रशिक्षक तसेच क्रीडाप्रेमींकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

## गो सन्मान अभियानासाठी सर्वपक्षीय कार्यकर्त्यांचा संकल्प




प्रतिनिधी ४ ऑक्टोबर

**अकोट :** गो-सन्मान अभियानाच्या अनुषंगाने अकोट शहर व तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांची महत्त्वपूर्ण बैठक सेंट पॉल्स अकॅडमी येथे २ ऑक्टोबर रोजी झाली.या बैठकीस अकोट शहरातील विविध राजकीय पक्षांचे मान्यवर, सामाजिक क्षेत्रात कार्य करणारे कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार बांधव, व्यापारी बांधव तसेच विविध संस्था व संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत गो-सन्मान, गोसंरक्षण व जनजागृती या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. अभियानाच्या पुढील नियोजनाबाबत उपस्थित मान्यवरांनी आपापल्या सूचना व विचार मांडले. यावेळी त्र्यंबकगिरी महाराज यांनी प्रमुख मार्गदर्शन करताना गो-सन्मानाच्या व्यापक सामाजिक भूमिकेबाबत मार्गदर्शन केले. समाजातील विविध घटकांनी एकत्र येऊन शांततापूर्ण, कायदेशीर व लोकशाही मार्गाने जनजागृती करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

## 'मधु संध्या' भक्ती गीतांच्या सुरेल संगमाने रंगली




प्रतिनिधी ४ ऑक्टोबर

**अकोट :** अकोट शहरातील सामाजिक संस्था असलेल्या रोटरी क्लब अकोट व्हिजन तथा IFRM विदर्भ व्हिजन यांच्या वतीने आयोजित 'मधु संध्या भक्ती गीतांचा सुरेल संगम' हा भक्तिमय कार्यक्रम शेतकरी मोटर्स, दर्यापूर रोड, अकोट येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. स्व. मधुकर बळीराम भुस्कट यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित या कार्यक्रमात वैष्णव महाराज बोरोडे व सर्व IFRM सदस्य संदेश रोडे,दिपाली कडू,आनंद भोरे, मोहन सपकाळ अजित सपकाळ अरुण सांगळोदकर, संदीप ढोक, अनंत काळे, दीपक तळोकर किरण गुहे,डॉ शितल गावंडे, डॉ संदीप कासट,कु विरा प्रशांत खोडके सादर केलेल्या भक्तिगीतांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमात भक्ती गीताचे मर्म सांगत अतिशय सुंदर असे संचालन हरीष ढवळे यांनी केले तथा साथ संगत मध्ये गौरव सुरत्ने,अश्विन बोरोडे, दुर्गेश बाळे, यांनी कार्यक्रमात उत्कृष्ट योगदान दिले. कार्यक्रमाला रोटरी क्लब अकोट व्हिजनचे अध्यक्ष संदीप भुस्कट, सचिव अभिजीत अग्रवाल, संस्थापक अध्यक्ष आनंद भोरे, किरण गुहे, प्रविण बनसोड, नंदकिशोर शेगोकार, प्रकल्प प्रमुख बाबुराव झामरे, सहप्रकल्प प्रमुख चेतन उपासे, संस्थापक संजय बोरोडे, अनंत काळे, निर्वाचित अध्यक्ष अतुल मालाणी, शंकर जांभुळकर, प्रकाश बिहाडे, स्वाती चिखले यांच्यासह रोटरी व IF-RMचे सदस्य उपस्थित होते.

भक्ती, संगीत आणि सामाजिक बांधिलकीचा सुंदर संगम घडवून आणणारी 'मधु संध्या' उपस्थितांच्या स्मरणात राहिली. कार्यक्रमाचे यशस्वी ते करिता शेतकरी परिवारातील अनिल खलोकार, अजिंक्य नाथे, कृष्णा नाथे,दर्शन ठाकूर, गौरव ठाकरे,वैभव काळे यांनी प्रयत्न केले अशी माहिती कल्पेश गुलाहे यांनी दिली.

## बजरंग तिडके यांची पशु-पक्ष्यांविषयी भूतदया



प्रतिनिधी ४ ऑक्टोबर

**हिवरखेड :** येथील देवळी वेश परिसराचे रहिवासी बजरंग तिडके हे भूतदयेने परिसरात चर्चेचा विषय ठरले आहेत.

दररोज पहाटे उठून आपल्या दिनचर्येची सुरुवात करण्याआधी ते अंगणात पक्षांसाठी दाणा-पाणी ठेवतात. त्यांच्या या नित्यनियमामुळे कबुतरांसह विविध पक्षी रोज सकाळी त्यांच्या दारात खाद्याचा लाभ घेतात. माणसाची सकाळ मोबाईलने सुरू होत असताना, तिडके यांनी पक्षांच्या सेवेतून दिवसाची सुरुवात करण्याचा आदर्श ठेवला आहे. त्यांचे हे कार्य पाहून परिसरातील लहान मुलांमध्येही पक्ष्यांविषयी प्रेम निर्माण होत आहे.

पशु-पक्ष्यांवर दया करा, निसर्ग वाचवा हा संदेश ते आपल्या कृतीतून देत आहेत.

## उकळी बाजार येथे सेवा संकल्प अभियान अंतर्गत आधुनिक दुग्धव्यवसाय प्रशिक्षण शिबीर

प्रतिनिधी ४ ऑक्टोबर

**तेल्हारा :** मौजे उकळी बाजार येथे ३ ऑक्टोबर रोजी पशुसंवर्धन विभाग, अकोला व विदर्भ आणि मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प अकोलाच्या वतीने

'सेवा संकल्प अभियान २०२६' अंतर्गत आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित एकदिवसीय दुग्धव्यवसाय प्रशिक्षण शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये दिवसभरात गावातील व परिसरातील पशुपालकांसाठी दोन सत्रांमध्ये विशेष मार्गदर्शन वर्ग घेण्यात आले. यामध्ये उपस्थित मान्यवर तज्ज्ञांनी आधुनिक दुग्धव्यवसायाशी संबंधित विविध विषयांवर सखोल माहिती दिली. डॉ. स्वप्नील कुकडे यांनी विदर्भ व मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प



योजना आणि शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असलेल्या किसान क्रेडिट कार्ड बाबतीत

लांडे यांनी दुग्धव्यवसायात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा तसेच दुधावर प्रक्रिया करून मूल्यवर्धन कसे साधता येईल, याविषयी प्रात्यक्षिकासह माहिती दिली. डॉ. योगेश देशमुख यांनी जनावरांचे पोषण आणि संतुलित पशुखाद्य व्यवस्थापन विषयावर प्रकाश टाकून दुग्धउत्पादन वाढीचे उपाय समजावून सांगितले. दोन्ही सत्रांनंतर प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या सर्व पशुपालक शेतकऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी अमर दुध संकलन केंद्राचे चंद्रकांत मार्के व पंचायत समिती तेल्हारा येथील पथकासह अभिलाष बारगीर (पशुधन पर्यवेक्षक, पंचगव्हाण), सैय्यद मुस्तकीन, राजेश डाबेराव, दत्ता राऊत यांनी परिश्रम घेतले.

# अकोलखेड महसूल मंडळातील संत्रा पीकविम्यासाठी शेतकरी आक्रमक

वि. प्रतिनिधी ४ ऑक्टोबर

## महसूलमंत्र्यांसह लोकप्रतिनिधींना निवेदन

**अकोट :** अकोट तालुक्यातील अकोलखेड महसूल मंडळातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या पीकविमा प्रश्नावरून शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी बोर्डी येथील शेतकऱ्यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार अनुप धोत्रे, आमदार प्रकाश भारसाखळे व आमदार रणधीर सावरकर यांना निवेदन सादर केले.



निवेदनात अकोलखेड महसूल मंडळातील संत्रा उत्पादकांना पीकविमा योजनेचा लाभ मिळविताना हवामान केंद्राच्या नोंदी व विविध निकषांमुळे अडचणी निर्माण होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. यामुळे अनेक पात्र शेतकरी विमा लाभापासून वंचित राहत असल्याची खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

तसेच, संत्रा पीकविमा योजनेत अकोलखेड सर्कलकडे वारंवार दुर्लक्ष केले जात असून जाणीवपूर्वक अन्याय होत असल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे. संत्रा उत्पादकांच्या अडचणींची गांभीर्याने दखल घेऊन पीकविम्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा तसेच अकोलखेड महसूल मंडळातील सर्व पात्र शेतकऱ्यांना संत्रा पीकविम्याचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. निवेदन सादर करताना अकोलखेड महसूल मंडळातील तसेच बोर्डी परिसरातील संत्रा उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या या मागणीवर शासन व संबंधित यंत्रणा कोणती भूमिका घेतात, याकडे परिसरातील संत्रा उत्पादकांचे लक्ष लागले आहे.

## सेंट पॉल्स अकॅडमीत महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी

वि. प्रतिनिधी ४ ऑक्टोबर

**अकोट :** स्थानिक श्रीजी कॉलनीस्थित सेंट पॉल्स अकॅडमी येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया होते. यावेळी उपाध्यक्ष लूणकरण डागा, सचिव प्रमोद चांडक, दीपम लखोटिया, शारदा लखोटिया, सुधा डागा, रेखा चांडक, अवनी लखोटिया, शाळेचे मुख्याध्यापक विजय बिहाडे, उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, रिंकू अग्रवाल, पर्यवेक्षक नितीन गावंडे, मालती



महाले, सुचिता गायकवाड, वैशाली गावत्रे व प्रभूदास नाथे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून तसेच महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी वेदांश सुलेखिया यांनी महात्मा गांधी तर निर्भय लोणकर यांनी लालबहादूर शास्त्री यांची व्यक्तिरेखा प्रभावीपणे साकारली. यानंतर इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी गांधीजी व शास्त्रीजी यांच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे सादर केली. यामध्ये अहिल जुल्फी, वेदिका ढगे, देवांश ठाकूर, विदीप्ता पायघन, लक्ष्मी गावंडे आणि युवराज बोरकुटे यांनी सहभाग नोंदविला. इयत्ता सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांची ए, बी, सी व डी अशा चार गटांमध्ये विभागणी करण्यात आली होती. यामध्ये ए गटाने प्रथम क्रमांक पटकावला.

# सुरळीत वीजेसाठी कृषीपंपाला कॅपासिटर आवश्यक

## मोहिम उघडत महावितरणकडून परिमंडळात कॅपॅसिटरची जनजागृती

प्रतिनिधी ४ ऑक्टोबर

**अमरावती:** दुष्काळाच्या स्थितीत कृषीपंपाला सुरळीत वीज पुरवठा करण्यासाठी महावितरण बांधिल असून, शेतकऱ्यांनीही कृषीपंपाला कॅपासिटर लावून सहकार्य करावे, असे आवाहन मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी केले आहे. कॅपॅसिटरची कृषीपंपाला गरज काय ? आणि कॅपॅसिटर सुरळीत वीज पुरवठ्यासाठी कसे काम करते, याबाबत परिमंडळात मोहिम उघडण्यात आली असून या नोहिमेत क्षेत्रिय अभियंत्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना कॅपॅसिटरची फायद्याबाबत माहिती द्यावी आणि कृषीपंपाला कॅपॅसिटर लावण्याबाबत प्रवृत्त करावे असे निर्देश देण्यात आले आहे.

### अत्यल्प खर्चात कॅपॅसिटर उपलब्ध

» बाजारात एल अँड टी, कॅपको, हॅवेल्स यांसारख्या नामांकित कंपन्यांचे कॅपेसिटर सहज उपलब्ध असून अवघ्या ३०० ते ५०० रुपयांच्या नाममात्र खर्चात हजारो रुपयांची मोटार जळण्यापासून वाचवता येते. यामध्ये ३ एचपी मोटारीसाठी १ केव्हीएआर, ५ एचपी मोटारीसाठी २ केव्हीएआर, तर ७.५ एचपी मोटारीसाठी ३ केव्हीएआर क्षमतेचा कॅपेसिटर वापरणे आवश्यक आहे.

### ऑटोस्विचमुळे मोठे नुकसान

» वीज पुरवठा सुरू होताच सर्व शेतीपंप एकाच वेळी आपोआप सुरू व्हावेत यासाठी बहुतांश शेतकऱ्यांनी 'ऑटोस्विच' बसवले आहेत. मात्र, या ऑटोस्विचमुळे रोहित्रावर (ट्रान्सफॉर्मर) अचानक प्रचंड भार येऊन रोहित्र जळणे, लाईन ट्रिप होणे आणि विजेच्या तारा तुटण्याचे प्रकार वारंवार घडत आहेत. ही गंभीर समस्या टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी ऑटोस्विच तात्काळ काढून कृषीपंपाला योग्य क्षमतेचा 'कॅपेसिटर' बसवावा, असे आवाहन महावितरणचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी केले आहे.

शेतातील कृषीपंपांमध्ये 'इंडक्शन मोटर'चा वापर केला जातो, ज्या सुरू असताना सुमारे ३० टक्के जास्त अतिरिक्त इंडक्टिव्ह करंट वीज वाहिन्यांवरून खेचतात. यामुळे विद्युत वाहिन्यांवर प्रचंड ताण येऊन ट्रान्सफॉर्मर ओव्हरलोड होतात आणि जळून खाक होतात. या तांत्रिक बिघाडाचा मोठा फटका महावितरणसह ऐन मोक्याच्या वेळी शेतकऱ्यांनाही बसतो.

या समस्येवर कॅपेसिटर हा अत्यंत प्रभावी उपाय आहे. कॅपेसिटर हे उपकरण पंपाला लागणारी 'रिॲक्टिव्ह पॉवर' थेट पुरवते, ज्यामुळे लाईनवरून वाहणारा अतिरिक्त वीज प्रवाह ३० टक्क्यांपर्यंत कमी होतो. यामुळे वीज यंत्रणेवरील ताण मोठ्या प्रमाणावर हलका होऊन ट्रान्सफॉर्मर जळणे आणि तारा तुटण्याच्या घटनांवर नियंत्रण मिळवणे शक्य होते. शिवाय, शेतकऱ्यांना उच्च व योग्य दाबाने (व्होल्टेज) अखंडित वीज मिळून कृषीपंप जळण्याचे प्रमाण घटते आणि त्याची कार्यक्षमताही वाढते.

# शिक्षकांच्या हक्कांसाठी सक्षम नेतृत्वाची गरज; डॉ. प्रशांत विघे यांची शिक्षक मतदारसंघातून उमेदवारी जाहीर

प्रतिनिधी ४ ऑक्टोबर



**अमरावती:** जुनी पेन्शन योजना, TETसंबंधी प्रश्न, शिक्षणाचे वाढते खासगीकरण, RTEची प्रभावी अंमलबजावणी, शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा वाढता भार, नोकरीची सुरक्षितता तसेच मराठी माध्यमाच्या शाळांमधील घटती विद्यार्थीसंख्या, असे विविध प्रश्न सध्या शिक्षकांसमोर आहेत. या प्रश्नांना विधान परिषदेत प्रभावीपणे मांडण्यासाठी सक्षम आणि अभ्यासू शिक्षक नेतृत्वाची आवश्यकता असल्याचे मत डॉ. प्रशांत विघे यांनी व्यक्त केले.

शिक्षकांना अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळावा, सेवा-सुरक्षिततेचे प्रश्न मार्गी लागावेत, पेन्शनसंबंधी प्रश्नांवर ठोस भूमिका घेतली जावी तसेच TETसंबंधी अडचणी दूर करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

सरकारी तसेच मराठी माध्यमाच्या शाळांचे अस्तित्व आणि गुणवत्ता टिकविण्यासाठीही प्रभावी प्रयत्न आवश्यक आहेत. शिक्षकांच्या प्रश्नांचा अभ्यास, संघटनात्मक अनुभव आणि शैक्षणिक क्षेत्रातील विविध विषयांवरील भूमिका या आधारावर शिक्षक प्रतिनिधित्वाचा विचार होणे गरजेचे असल्याचे डॉ. विघे यांनी नमूद केले.

या पार्श्वभूमीवर डॉ. प्रशांत विघे यांनी अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली आहे. शिक्षकांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन शिक्षण क्षेत्रातील विविध समस्यांवर विधान परिषदेत आवाज उठविण्याची भूमिका त्यांनी मांडली आहे.

जुनी पेन्शन, TET, सरकारी शाळांचे संरक्षण, अशैक्षणिक कामांचा भार, शिक्षणाचे खासगीकरण आणि शिक्षकांची नोकरीची सुरक्षितता या विषयांवर शिक्षकांमध्ये व्यापक चर्चा होणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

"शिक्षकांचे प्रश्न, शिक्षणाचे भवितव्य आणि प्रभावी शिक्षक प्रतिनिधित्व" या5 मुद्द्यांना केंद्रस्थानी ठेवून डॉ. प्रशांत विघे यांनी आपली भूमिका शिक्षकांसमोर मांडली आहे.

# 'सेवा संकल्प अभियान" अंतर्गत अमरावती ग्रामीण घटकातील गणपती विसर्जन घाटांची स्वच्छता मोहीम

प्रतिनिधी ४ ऑक्टोबर



**अमरावती :** कौंडण्यपूर विसर्जन घाटासह अमरावती ग्रामीण घटकातील ३१ पोलीस स्टेशन हद्दीतील विसर्जन घाटांवर विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

अमरावती ग्रामीण जिल्हा पोलीस दलाच्या वतीने दिनांक ०३ ऑक्टोबर २०२६ रोजी महाराष्ट्र शासन प्रणित 'सेवा संकल्प अभियान" अंतर्गत पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक गणपती विसर्जन घाट स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. घटकातील सर्व ३१ पोलीस स्टेशन अंतर्गत संबंधित पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी, दुय्यम अधिकारी व अंमलदार यांनी आपल्या हद्दीतील गणपती येथील दोन प्रमुख विसर्जन घाटांवर विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या स्वच्छता मोहिमेत पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी स्वतः सहभाग नोंदविला तसेच अमरावती पोलीस मुख्यालयातील अधिकारी व अंमलदार आणि पोस्टे कु-र्हा येथील अधिकारी व अंमलदार, असे एकूण २० अधिकारी व १३० अंमलदारांनी दोन्ही विसर्जन घाटांच्या स्वच्छता मोहिमेत तसेच संपुर्ण जिल्हयात ११२ अधिकारी जलस्रोत स्वच्छ ठेवणे, त्यांचे प्रदूषण टाळणे आणि त्यांचे संवर्धन करणे ही सामूहिक जबाबदारी आहे. याच उद्देशाने जलस्रोतांची स्वच्छता करून त्यांचे संवर्धन व संरक्षण करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या 'सेवा संकल्प' अभियानांतर्गत अमरावती ग्रामीण जिल्हा पोलीस दलाच्या सर्व पोलीस स्टेशनच्या हद्दीत दिनांक ०३/१०/२०२६ रोजी सदर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

# भानखेडा तलावात पुन्हा दोन 17 वर्षीय मुलांचा बुडून मृत्यू

## प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा बळी - प्रविण हरमकर यांचा आरोप, सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

प्रतिनिधी ४ ऑक्टोबर

**अमरावती:** शहरातील बडनेरा संघातंर्गत येणारा भानखेडा परिसर मानवी जीवनास धोकादायक झालेला असून या परिसरातील तलावात काल परत एकदा दोन १७ वर्षीय शाळकरी विद्यार्थ्यांचा येथील तलावात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही घटना अत्यंत हृदयद्रावक असून प्रशासनाच्या बेजबाबदार कारभारामुळे घडली आहे, असा आरोप शिवसेना शहर प्रमुख श्री. प्रविण वसंतराव हरमकर यांनी केला आहे.

यापूर्वी मार्डी रोड, गोडे मेडिकल कॉलेज जवळील तलावात ४ निष्पाप जीवांचा मृत्यू झाला होता. त्यावेळी श्री. प्रविण हरमकर यांनी दि. १६/०६/२०२६ रोजी निवेदन देऊन तलाव सुरक्षित करण्याची मागणी केली होती.

त्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासन, उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ, अमरावती यांनी दि. १७/०९/२०२६ रोजी जा.क्र. २७९१/उवसिमं/तां.७/सि.व्य.१/निवेदन/२०२६ अन्वये आदेश काढला होता की, विभागांतर्गत असलेल्या सर्व प्रकल्पांवर धोक्याचे फलक लावण्यात येऊन सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कराव्यात. (पत्र सोबत जोडले आहे)

परंतु; या आदेशाचे पालन न करता भानखेडा येथील तलाव आजही असुरक्षित ठेवण्यात आलेला आहे. ना कुंपण, ना सुरक्षा रक्षक, ना धोक्याचे फलक. त्यामुळेच आज पुन्हा दोन मुले बळी पडली.

जिल्ह्यातील राजकीय नेते आणि संबंधित अधिकारी झोपले आहेत का? असा सवाल उपस्थित होत आहे. निष्काळजी अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून त्यांना निलंबित करावे आणि तात्काळ सर्व तलावांना कुंपण घालून सुरक्षा व्यवस्था करावी, अशी मागणी प्रवीण हरमकर यांनी केली आहे. या सोबतच, प्रमोद पांडे, संध्या अवसरे, मोनाली आगाशे, संगिता गजभिये, अंजली पांडे, दत्ता पाटणे, वसंत पाटील, बिजवे, अमोल आगाशे, दिपक कोल्हे, पिंटू दाते, प्रकाश ढोरे, प्रविण शेंडे, चौधरी, राऊत, गुल्हाने, वासुदेव अवसरे यांनी नमूद केले आहे की; कधी काळी सूचना दिल्यानंतर, जीव जाण्यापुर्वी प्रशासन दखल घेत होते. आज अनेकदा जीव गेल्यानंतरही प्रशासन दखल घेत नसल्याने आज परत एकदा कडु व चव्हाण परिवारातील दोन शाळकरी विद्यार्थ्यांचे जीव गेलेत. ज्या उद्देशाने जंगलात तलाव निर्माण झाले आहेत. त्या उद्देशाची पुर्ती करतेवेळी सुरक्षितता जपणे प्रशासनाची जबाबदारी आहे. जीव गेल्यानंतर चार दिवस फुकटचा आव आणून वीसरभोळ्या प्रशासकीय प्रवृत्तीमुळे आता, पालकांनीही आपआपल्या मुलांच्या शाळा, ट्युशन, ईतर वेळी सतत संपर्कात राहणे आवश्यक असल्याचे प्रमोद पांडे यांनी नमूद केले आहे. अमरावतीतील सर्वांगीणदृष्ट्या धोक्यात आलेली कौटुंबिक, नागरिक असुरक्षितता सुरक्षित करण्याकरीता शासन, प्रशासन व नागरिकांनी दक्ष राहणे आवश्यक आहे. विशेषत: पाण्याच्या ठिकाणी घडणाऱ्या दुर्दैवी अपघाती, दुर्घटनांचे जिल्ह्यात ठरलेली ठिकाणे असून, सर्वच ठिकाणी बंदोबस्त शक्य नसल्याने किमान, अशा तलाव, नद्या, विहिरी, व अन्य अशा अपघाती व निर्जनस्थळी, संबंधित सुरक्षा रक्षक व संपर्काच्या क्रमांकांचे किमान चार पाच फलक लावणे, शिवाय, संबधित विभागांनी फिरते सुरक्षा रक्षकांच्या माध्यमातून फिरती गश्त ठेवणे, आणि, स्वतः मुलांनीच अशा ठिकाणी न जाणे, पालकांनी सतत मुलांच्या संपर्कात राहणे, नागरिकांना असे काही आढळल्यास संबंधित विभागाला कळविणे, तूर्त, या उपाय योजना जरी, केल्यात तरी दुर्दैवी घटनांना आळा बसेल. अर्थातच, केवळ कागदी प्रसिद्धीच्या झोतात दंग राहणारे प्रशासन हा विषय कितपत गांभिर्याने घेतात हा प्रश्नच आहे. झोपेचे सोंग घेतलेल्या मुर्दाड शासन प्रशासन व्यवस्थेचे हे जीवघेणे दुर्दैवी परिणाम आज अमरावतीकर कुटुंबीयांना भोगावे लागत असल्याचे प्रमोद पांडे यांनी नमूद केले आहे.



विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे अधिकृत उमेदवार दिलीप कडू यांच्या प्रचारार्थ नागपूर शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले यांची प्रतिक्रिया दिली. माजी आमदार व्ही यु डायगव्हाणे यांचीही उपस्थिती होते. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाकडून दिलीप कडू यांचा नामांकन अर्ज दाखल केला.

# स्केटिंग स्पर्धेत अन्वी शिंगाणेचे उल्लेखनीय यश!

**अमरावती :** पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल, अमरावतीच्या इयत्ता चवथी मध्ये शिकणारी विद्यार्थिनी कु. अन्वी शिंगाणे हिने जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवून शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे.

या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर अन्वीची विभागीय स्तरावरील शालेय स्केटिंग चॅम्पियनशिपसाठी निवड झाली आहे.



तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक सचिन दुर्गे, उपमुख्याध्यापिका सौ. सोनल निस्ताने तसेच क्रीडा विभागाने तिचे अभिनंदन करून विभागीय स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# तिन्ही खेळाडूंच्या कर्तृत्वाला माझा सलाम -खा. अनिल बोंडे

## अभिमानास्पद : सुवर्ण विजेत्यांच्या पालकांशी महसूलमंत्र्यांचा संवाद



**अमरावती :** जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत तिरंदाजीमध्ये सुवर्णवेध घेत अमरावतीच्या कुमकुम मोहोड, यशदीप भोंगे आणि भारती फुलमाळी या तिन्ही सुपुत्रांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची मान जगात उंच केली आहे. या ऐतिहासिक यशामुळे अमरावतीसह संपूर्ण महाराष्ट्रात आनंदाचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या वतीने तिन्ही सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूंच्या घरी जाऊन त्यांच्या आई-वडिलांचा पेढा भरवून आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. खासदार डॉ. अनिल बोंडे आणि भाजपच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी खेळाडूंच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या पालकांचा गौरव केला. तसेच या तिन्ही खेळाडूंनी केलेल्या अतुलनीय सुवर्ण कामगिरीला माझा सलाम, असे खेळाडूंविषय गौरवोद्गार काढले. याप्रसंगी राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी खासदार बोंडे यांच्या माध्यमातून फोनवरून तिन्ही सुवर्ण विजेत्यांच्या पालकांशी थेट संवाद साधला.

# कुमकुमच्या सुवर्णविजयाचा, यशदीपच्या रौप्यविजयाचा पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपतर्फे गौरव

प्रतिनिधी ४ ऑक्टोबर



**अमरावती:** जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये अमरावतीच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत शहराच्या क्रीडा क्षेत्राचा गौरव वाढविला आहे. महिला रिकर्व्ह सांघिक तिरंदाजीमध्ये अमरावतीची सतारा वर्षीय कुमकुम अनिल मोहोड हिने ऐतिहासिक सुवर्णपदक पटकावून अमरावतीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. तिच्या या अभिमानास्पद कामगिरीबद्दल पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपच्या वतीने कुमकुमचे वडील अनिलजी मोहोड यांचा सन्मान व सत्कार करण्यात आला.

कुमकुमच्या या ऐतिहासिक यशामुळे अमरावतीसह संपूर्ण महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्राचा गौरव वाढला असून, तिच्या पुढील क्रीडा कारकिर्दीस संस्थेच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.

याच स्पर्धेत अमरावतीचा आघाडीचा भारतीय तिरंदाज यशदीप भोगे यानेही दमदार कामगिरी करत रौप्यपदक पटकावले. त्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपच्या वतीने यशदीपच्या पालकांचा सन्मान व सत्कार करण्यात आला. यशदीपने भविष्यातही देशाचे आणि अमरावतीचे नाव उज्ज्वल करावे, यासाठी त्याला शुभेच्छा देण्यात आल्या. विशेष म्हणजे, सुवर्ण कामगिरी करणाऱ्या कुमकुम मोहोडला घडविण्यात प्रशिक्षक प्रफुल्ल डांगे सर यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्यांच्या मार्गदर्शनातून कुमकुम मोहोड ने आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांच्या या योगदानाची दखल घेत पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपच्या वतीने कोच प्रफुल्ल डांगे यांचाही यथोचित सत्कार करण्यात आला.

# तीन दिवसीय एकात्मिक योग शिबिराची सांगता

## ५०० हून अधिक साधकांना योग, प्राणायाम आणि ध्यानाचा लाभ झाला

प्रतिनिधी ४ ऑक्टोबर



**अमरावती:** पतंजली परिवार अमरावतीतर्फे श्री. गजानन धाम, गजानन महाराज मंदिर, क्रांती कॉलनी, अमरावती येथे आयोजित तीन दिवसीय एकात्मिक योग शिबिराची शनिवारी उत्साही आणि आध्यात्मिक वातावरणात सांगता झाली. १ ते ३ ऑक्टोबर दरम्यान चाललेल्या या शिबिरात शहराच्या विविध भागांतील ५०० हून अधिक साधकांनी सहभाग घेतला होता.

समापन समारंभात स्वामी ऋतदेवजी महाराज यांची विशेष उपस्थिती आणि मार्गदर्शन लाभले. त्यांनी साधकांना योगाच्या माध्यमातून शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक शांती, सकारात्मक विचार आणि संतुलित जीवनशैली अंगीकारण्यास प्रोत्साहित केले. त्यांनी यावर जोर दिला की नियमित योग, प्राणायाम आणि ध्यानामुळे दैनंदिन जीवनात शिस्त आणि ऊर्जा निर्माण होते.

### समारोप समारंभातील मान्यवर पाहुणे

समापन समारंभाचे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ उद्योजक चंद्रकुमार जी जाजोदिया होते. डॉ. सागर भुताडा आणि डॉ. सौ. राधिका भुताडा, त्यांच्या पतींसह, अशोक मुंडाडा, अक्षय धनोरकर, रतिलाल सातपुते, अशोक बेंडे, डॉ. राजेश चांडक, कार्तिक चांडक, तेजस गोटारकर, प्रभाकर शिरसाट, अरविंद परदेसी जांगला, डॉ. वंदना पराटे, वृंदताई देशमुख आणि त्यांची टीम, गुड्डू, गुड मॉर्निंग क्लबचे अध्यक्ष साबळे, तसेच अनेक मान्यवर, समाजसेवक, पतंजली परिवारातील अधिकारी व कर्मचारी, योग शिक्षक आणि मोठ्या संख्येने साधक उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक योग आणि प्रार्थनेने झाली. यानंतर, साधकांनी विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानाचा सराव केला. संपूर्ण परिसरात योग आणि आध्यात्मिक ऊर्जेचे वातावरण पसरले होते. तीन दिवसीय शिबिरादरम्यान, साधकांनी शारीरिक आरोग्य जपण्यासाठी, तसेच मन एकाग्र आणि तणावमुक्त ठेवण्यासाठी विविध योग तंत्रांचा सराव केला.

### साधकांनी अनुभव कथन केले

समापन समारंभात, सहभागींनी आपले अनुभव कथन केले. अनेकांनी सांगितले की, तीन दिवसांच्या नियमित योग सरावाने त्यांना योगाचे विविध पैलू समजून घेण्यास आणि ते आपल्या दैनंदिन जीवनात समाविष्ट करण्यास प्रेरणा दिली. या शिबिरात लहान मुले, तरुण, महिला आणि ज्येष्ठ नागरिक यांनीही सहभाग घेतला होता.

# ग्रंथांच्या अध्ययनातून वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासा - साहित्यिक विठ्ठल कुलट

## मोर्शीत जिल्हा ग्रंथोत्सवाचा उत्साहात शुभारंभ

प्रतिनिधी ४ ऑक्टोबर



**अमरावती:** अंधश्रद्धा आणि काल्पनिक आख्यायिकांच्या प्रभावातून बाहेर पडण्यासाठी बहुजन समाजाने संत समाजसुधारक आणि विचारवंतांनी लिहिलेल्या वास्तववादी ग्रंथांचे अध्ययन करून त्यातील विचार आचरणात आणावेत. ग्रंथवाचनातून वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चिकित्सक विचार विकसित होतात, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक तथा प्रतिभा साहित्य संघाचे संस्थापक अध्यक्ष विठ्ठल कुलट यांनी केले.

राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयाच्या वतीने जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरणांतर्गत मोर्शी येथील पंजाब बाबा सभागृहात 3 व 4 ऑक्टोबर रोजी आयोजित जिल्हा ग्रंथोत्सवाचे आज उद्घाटन झाले. त्याप्रसंगी कुलट यांनी अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन केले.

### दुसऱ्या दिवशीही साहित्यिक मेजवानी

» ग्रंथोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी सकाळी 11 ते दुपारी 1 वाजे दरम्यान दोन व्याख्यान आणि एकपात्री प्रयोग सादर होणार आहेत. त्यातील पहिले व्याख्यान 'सार्वजनिक ग्रंथालयामधील सॉफ्ट स्किल्स आंतरवैयक्तीक कौशल्य आणि व्यावसायीक क्षमता' विषयावर डॉ.रविंद्र सरोदे यांचे तर 'वाचन संस्कृती काल आज आणि उद्या' विषयावर डॉ. राजेश बोबडे यांचे व्याख्यान होणार आहे. हर्षदा इंदोन यांचा 'मी वाचन संस्कृती बोलते' हा एकपात्री नाट्य प्रयोग तर आचल सरदार यांचा 'चला हसू या गाऊ या' हा नक्कल व गीत गायनाचा कार्यक्रम होणार आहे.

कुलट यांनी अंधश्रद्धा, वैज्ञानिक दृष्टिकोन, शेतकऱ्यांचे सुख-दुःख आणि कौटुंबिक नातेसंबंध यांसारख्या विषयांवर काव्यगायनातून भाष्य केले. समाजाने चिकित्सक वृत्ती जोपासण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

प्रसिद्ध कवी विजय सोसे यांनी "महात्मा फुलेंच्या ग्रंथातील शेतकरी आणि शेतकऱ्यांच्या कविता" या विषयावर भाष्य करताना त्यांच्या लोकप्रिय "दिसं निंगाला निंगाला पन सूर्य कुठी गेला | ज्याची कपटाची नीती, त्यानं हिसकून नेला..! तसेच कास्तकारीच्या डावात, नशीब माह्य हारलं, तरी वावरं पेरलं म्या, वावर पेरलं..! इत्यादी कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकलीत. यावेळी विचारपीठावरील अमरावती विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर घुगे, अमरावती ग्रंथालय संघाचे अध्यक्ष, चंद्रकांत चांगदे, ग्रंथ मित्र राजेश डांगटे या मान्यवरांनी ग्रंथांच्या विषयावर मौलिक विचार व्यक्त केलेत.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ख्रिस्त कॉलनी, ट्रेझरी ऑफिस नजीक, प्रफुल घवळे यांची बिल्डिंग अमरावती, C/0 गॅलक्सी बार जवळ येथे प्रकाशित केले. ■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A2977, RRC Helpline No. 8484842135